## पुष्प – २६ : व्यवहार

**सुखाचें व्यवहारीं सुखलाभ जाला...**

१. घरगृहस्थी सांभाळणाऱ्या आपल्या सगळ्यांना दररोज अनेक प्रकारचे व्यवहार करावे लागतात. त्यांपासून आपली सुटका नसते. सुटका करून घ्यायचीही नसते आणि व्यवहारही टाळायचे नसतात.

२. रोजच्या जीवनातील हे व्यवहार शुद्ध असले पाहिजेत यांवर संतांचा कटाक्ष आहे.

३. कुटुंबाचा संसार चालवायचा तर पैसे हवेतच. धन मिळवू नये असे आमचे संत अजिबात सांगत नाहीत. मात्र, धनप्राप्ती करून देणारा व्यवहार 'उत्तम' असावा, यांबाबत तुकोबाराय आग्रही आहेत.

४. कोणत्याही व्यवहारात नेहेमी एकापेक्षा अधिक व्यक्ती सहभागी असतात. व्यवहारातील प्रत्येक व्यक्तीला तो व्यवहार सुखदायक ठरावयास हवा आणि तसा तो ठरला तरच त्याला 'उत्तम व्यवहार' असे म्हणता येईल.

५. शुद्ध बुद्धीने साधलेल्या उत्तम व्यवहाराद्वारे गाठीला बांधलेले धन 'उदास'पणे म्हणजे तारतम्याने खर्च करावे, असा तुकोबारायांचा सांगावा आहे. जिथे खर्च करणे ज्या वेळी आवश्यक आहे अथवा असेल तिथे उधळपट्टी न करता आपल्याजवळील पैसा विचारपूर्वक वापरणे तुकोबारायांना अभिप्रेत व अपेक्षित आहे.

**************************************************

**संतबोल :**

- सुखाचें व्यवहारीं सुखलाभ जाला। आनंद कोंदला मागें पुढें।। (श्रीतुकोबाराय)
- जोडोनियां धन उत्तम वेव्हारें। उदास विचारें वेच करी।। (श्रीतुकोबाराय)

**मंजिरी – २६**

१. रोजच्या जगण्याशी संबंधित असणारा कोणताही व्यवहार प्रत्येकाने प्रामाणिकपणे करावा, हे भागवत धर्माला अपेक्षित आहे. समोर असणारा त्या व्यवहारातील दुसरा घटक कोणीही असला तरी त्याला फसवून अथवा लुबाडून कोणताही व्यवहार आपण करू नये, यांबाबत संतांचा कटाक्ष आहे.

२. व्यवहारात सहभागी असणारा दुसरा घटक प्रत्यक्ष भगवंताचेच रूप आहे, या भावनेने आपण व्यवहार केला तर कोणाला फसवण्याची बुद्धीच आपल्याला होणार नाही.

३. तशी दृष्टी जनाबाईमाउलींना लाभलेली होती. त्यांमुळे, रोजच्या कामांतील सगळे व्यवहार आपण प्रत्यक्ष देवाशीच करतो आहोत, ही भावना जनाबाईमाउलींच्या अंत:करणात सदोदित जागी असे.

४. प्रत्यक्ष भगवंतच सर्व मनुष्यमात्रांच्या रूपाने नटलेला आहे, ही भावना आपल्या चित्तात जागती ठेवून आपण प्रत्येक क्षणी जगणे आमच्या संतांना अभिप्रेत आहे. मनुष्यरूपाने वावरणाऱ्या भगवंताशीच आपले सगळे व्यवहार होत असतात ही जाणीव ह्रदयात स्थिर झाली की अनैतिक, लबाडीचे व्यवहार आपल्या हातून कधीच घडणार नाहीत. त्यांमुळे जगाचा व्यवहारही शुद्ध आणि निकोप बनेल.

*************************************************

**संतबोल :**

- देव देते देव घेते। देवासवें व्यवहारिते।। (श्रीजनाबाईमाउली)
- भूतीं देव म्हणोनि भेटतों या जना। नाहीं हे भावना नरनारी।। (श्रीतुकोबाराय)
- जें जें भेटे भूत। तें तें मानिजे भगवंत। हा भक्तियोगु निश्चित। जाण माझा (ज्ञा. १०.११८)